# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

बेटी बचाओ save the girl child

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक (वै)<br>कार्यालय दूरध्वनी क्र. | २६०५८९९६<br>२६०५८७३९<br>२६०५८१३९<br>२६०५८४७६ | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण,<br>माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन,<br>राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे,पुणे १<br>फॅक्स नं.-०२० - २६०५८७६६ / २६०५८१५९ |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र. राकुकका/आरोग्य कर्मचारी/ कर्तव्ये व जबाबदाऱ्या/<br>कक्ष-१०ब/ नस्ती क्र.४३०/१६६८२ - १६८४६ /१२<br>दिनांक :- २६/२/२०१२ |


प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद ............. (सर्व)

**विषय - बहुउददेशीय आरोग्य कर्मचारी (महिला) या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या**

**संदर्भ - १) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई कडील शासन निर्णय क्र. आईएस१०. १००१/प्र.क्र.१२०/सेवा१ दि.११ डिसेंबर २००१**
**२) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कडील कंत्राटी अतिरिक्त एएनएम यांच्या कामाबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचना**

राज्यात १०५७९ उपकेंद्र कार्यरत असून ७१३५ उपकेंद्र स्तरावर कंत्राटी पध्दतीने अतिरिक्त सहाय्यकारी परिचरिका प्रसाविका याची पदे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानअंतर्गत भरण्यात आली आहेत. उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार उपकेंद्र स्तरावरील काम करणाऱ्या बहुउददेशीय आरोग्य कर्मचारी (महिला) या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून कंत्राटी पध्दतीने नेमण्यात आलेल्या अतिरिक्त एएनएम यांच्या कामाबाबत संदर्भ (२) अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. उपरोक्त संदर्भिय आदेशावर आधारित आरसीएच अंतर्गत उपकेंद्र स्तरावरील एएनएम यांनी सर्व गरोदर महिलांचे बाळंतपण संस्था स्तरावर प्रशिक्षित व्यक्तींकडून करण्यात यावे असे अभिप्रेत आहे. उपकेंद्र स्तरावरील काम करणाऱ्या सहाय्यकारी परिचारिका प्रसाविका/आरोग्यसेविका यांना प्रामुख्याने माता व बाल संगोपन कार्यक्रमासंदर्भात जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या आहेत. याव्यतिरिक्त इतर महत्वाचे राष्ट्रीय कार्यक्रमाच्या संदर्भात देखील काही कृती पार पाडावयाच्या आहेत. ज्या उपकेंद्राच्या ठिकाणी २ सहाय्यकारी परिचारिका प्रसाविका/आरोग्यसेविका कार्यरत आहेत त्यांनी उपकेंद्र कार्यक्षेत्रातील गावे व लोकसंख्या याची ५० टक्के विभागणी करुन घरभेटीची तसेच ग्रामआरोग्य व पोषण दिनासंदर्भातील कामे करावयाची आहेत. तसेच मुख्यालयाच्या ठिकाणी एकाने उपस्थित राहून २४ तास व ७ ही दिवस बाळंतपणासाठी येणाऱ्या महिलांना सेवा दयावयाची आहे. यापध्दतीने काम केल्यास कार्यक्षेत्रामध्ये व लोकांमध्ये बाळंतपणाची सोय ही २४ तास असल्याबाबत विश्वासार्हता निर्माण होईल व जी बाळंतपणे आज घरी होतात त्यापैकी बरेच लाभार्थी हे किमान उपकेंद्र स्तरावर बाळंतपणासाठी येतील.

**सहाय्यकारी परिचारिका प्रसाविका यांनी आरसीएच अंतर्गत कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे कामे करावीत.**

१) सर्व असुरक्षित जोडप्यांना दरमहा भेटी देऊन मासिक पाळीबाबत चौकशी करुन लवकरात लवकर Urine pregnancy test च्या सहाय्याने महिला गर्भवती असल्याची खातरजमा करुन नोंद करणे व त्यापैकी जोखमीच्या माता यांचे वर्गीकरण करणे.

२) दरमहा ग्राम आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी सर्व गरोदर मातांची वजन, रक्तदाब व शारिरीक तपासणी करणे तसेच गरोदरपणी १२ आठवडच्या आत व २८ आठवडयानंतर किमान एकदा हिमोग्लोबिनची तपासणी करणे. तसेच प्रत्येक भेटीमध्ये लघवी मधील लघवी(शुगर/अल्ब्युमीन) बाबत पडताळणी करणे.

कृ.मा.प.

३) गरोदर मातांना धनुर्वाताचे इंजेक्शन देणे व लोहयुक्त गोळयाचे वाटप करुन गोळयांच्या सेवनांचे संनियंत्रण करणे.

४) सर्व गरोदर महिलांबाबतची माहिती एमसीटीएस या सॉफटवेअर मध्ये नियमितपणे भरण्यात यावी व त्याद्वारे प्राप्त सूचनानुसार लाभार्थ्यांना सेवा उपलब्ध करुन दयाव्यात.

५) प्रसूतिचा सुक्ष्मकृती आराखडा (Birth Micro Planning) तयार करणे. यामध्ये अपेक्षित प्रसुतीची तारीख व जोखमीची अवस्था लक्षात घेवून योग्य प्रसुतीचे ठिकाण निश्चित करणे.

६) उपकेंद्राच्या इमारतीमध्ये प्रसूति करणे. बाळंतपणासाठी मोफत वाहन व्यवस्थाबाबत लाभार्थी व नातेवाईकांना माहिती देणे.

७) आर १४, १५ व आर १६ मधील नोंदी नियमितपणे अदयावत करणे.

८) जननी सुरक्षा योजना १ मधील नोंदी नियमितपणे अदयावत करणे व दरमहा जननी सुरक्षा योजना २ प्रा. आ. केंद्रास सादर करणे.

९) जननी सुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांस प्रसूतीनंतर ७ दिवसात चेकव्दारे अनुदान अदा करणे.

१०) ग्राम आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी बालकांचे प्रत्यक्ष लसीकरण करणे.

११) आय.एम.एन.सी.आय च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे नवजात अर्भकास ३ अथवा ६ भेटी देणे व मुल्यमापन फॉर्म भरणे.

१२) आय. एम. एन.सी.आय चा अहवाल दरमहा विहीत कालावधीत प्राथमिक आरोग्य केंद्रास सादर करणे.

१३) ग्राम आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी कुपोषित बालकांचे सॅम/मॅम वर्गीकरण करणेसाठी अंगणवाडी कार्यकर्तीला मदत करणे आणि अशा बालकांना VCDC/ CTC मध्ये दाखल करणे.

१४) एम.सी.टी.एस. मधील वर्क प्लॅन च्या आधारे सेवांचे नियोजन करणे.

१५) एम.सी.टी.एस. मध्ये नोंदी दर आठवडयाला भरणे व अद्यावत करणे.

१६) दरवर्षी योग्य जोडप्यांचा सर्वेक्षणाचे काम पूर्ण करणे व त्यामधील पात्र लाभार्थी कुटुंब नियोजन पध्दतीसाठी प्रवृत्त करणे. तसेच नवीन लाभार्थींचा दरमहा समावेश करुन नोंदवहया अद्यावत ठेवणे.

१७) पाळणा लांबविण्यासाठी असंरक्षित जोडप्यास तांबी बसविणे व पाठपुरावा करणे.

१८) कु. क. शस्त्रक्रियेसाठी लाभार्थींना प्रवृत्त करणे.

१९) उपकेंद्रस्तरावरील औषधीसाठा नोंदवही अद्यावत ठेवणे.

२०) उपकेंद्र बळकटीकरण व वार्षिक देखभाल निधीचा हिशोब विहीत नमुन्यामध्ये ठेवणे.

२१) उपकेंद्र बळकटीकरणतून खरेदी केलेल्या साहित्याची साठा नोंदवही (Dead stock) मधील नोंदी अद्यावत करणे.

२२) दरमहा विहीत कालावधीत उपकेंद्राचा मासिक प्रगती अहवाल (एम.पी.आर.) प्रा.आ. केंद्रास सादर करणे.

२३) ज्या जिल्हयांमध्ये मानव विकास कार्यक्रम, इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना कार्यान्वित आहेत त्या जिल्हयातील लाभार्थींना योजनेबाबत माहिती देणे तसेच जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाची माहिती लाभार्थी, आशा, अंगणवाडी वर्कर यांना देणे.

**अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा**
**कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे.**

**प्रति,**
**१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ........ (सर्व)**
**२) उपसंचालक, आरोग्य सेवा प्रभारी मंडळ .......... (सर्व)**